# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

क्र.कोविमं/माध्य.गोप./1047
कोल्हापूर-४१६ ००४.
दिनांक :- ०८.०९.२०२१

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा सप्टे./ऑक्टों.- २०२१ च्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते भरणेबाबतच्या व साहित्य वितरणाबाबतच्या सुचना...**

**संदर्भ:- राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/५२३६ दिनांक २७.०८.२०२१**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) सप्टे./ऑक्टों.-२०२१ परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषा विषयांची तोंडी परीक्षा तसेच विज्ञान व गणित, तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दि.२१.०९.२०२१ ते दि. ०५.१०.२०२१ रोजी आयोजित करण्यात याव्यात. या विभागीय मंडळामार्फत तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत मुल्यमापन परीक्षेच्या साहित्याचे वाटपाच्या तारखेविषयी स्वतंत्रपणे सुचना देण्यात येतील.

सप्टे./ऑक्टों.-२०२१ ची शास्त्र प्रात्यक्षिक परीक्षा केंदस्थळी होत असल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षेचे गुणतक्ते केंदशाळेकडे देण्यात येणार असून आपण केंदशाळेशी संपर्क साधून प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळेचे निश्चितीकरण करुन विद्यार्थ्यांना त्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देणे सुलभ होईल.

कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर इ. १० ची विज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा मंडळाच्या प्रचलित पध्दतीने घेतली जाणार नाही. त्याऐवजी प्रात्यक्षिकांवर आधारीत विशिष्ट लेखनकार्य (Assignments), प्रकल्प, प्रात्यक्षिक वही व गृहपाठ याचा समावेश असेल.

श्रेणी, तोंडी व ईतर अंतर्गत मुल्यमापन इत्यादी परीक्षा घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना देण्यात येत आहे.

प्रात्यक्षिक व तोंडी/श्रेणी परीक्षाबाबत या कार्यालयाचे क्रमांक कोविमं/माध्यमिक/उच्च माध्यमिक गोपनीय/७५६६ दि. २६.०३.२०२१ च्या पत्राच्या अनुषंगाने परीक्षार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करावे.

भाषा विषयांची तोंडी परीक्षा/गणित विषयाची अंतर्गत मुल्यमापन परीक्षा तसेच तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा या संबंधित शाळेतच घ्यावयाच्या असल्यामुळे विज्ञान प्रात्यक्षिक व्यतिरीक्त इतर सर्व विषयांचे गुणतक्ते आपल्या शाळेस देण्यात येत असून ते नेहमीप्रमाणे OMR पध्दतीचे असल्यामुळे गुणतक्ते भरताना scanning योग्य रीतीने होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

## गुणतक्तेभरण्याबाबतच्या व मंडळाकडे सादर करण्याबाबतच्या सुचना

१. विद्यार्थ्यास प्राप्त गुण त्याच्या बैठक क्रमांका (Seat No) समोर दिलेल्या चौकटीतच सुवाच्य अक्षरात भरावे व त्या अनुषंगाने समोरील OMR चे वर्तुळ काळया/निळया (Black/Blue) शाईने भरावे.

२. बारकोड वर काहीही लिहू नये तसेच सही करु नये तसेच OMR Sheet ला फोल्ड/स्टॅपल करु नये.

३. गुणपत्रिका (Marksheet) भरताना OMR चे वर्तुळ भरलेले आहे व खाली Page Total केलेली आहे याची खातरजमा करुन घेण्यात यावी.

४. सदर देण्यात येणाऱ्या OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये कोण्त्याही प्रकारची खाडाखोड करु नये .

५. गुणपत्रिकेमध्ये असलेल्या छापील बैठक क्रमांकाच्या गुणांच्या बेरजेची गुणतक्त्यात नोंद घ्यावी. मात्र अतिरीक्त बैठक क्रमांकाने अथवा ऐनवेळी विषय बदल झाल्याने परीक्षेस प्रविष्ठ होणऱ्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये नसल्याने अशा विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक संबंधित विषयांच्या गुणतक्त्यामध्ये शेवटी लिहून त्यांची त्यासह बेरजेची गुणतक्त्यात नोंद ठेवणे.

६. काही शाळांनी आवेदनपत्र भरण्याच्या तारखेनंतर आवेदनपत्र विलंब, अति विलंब, विशेषअति विलंब शुल्काने भरले असल्यामुळे असे विद्यार्थी जर तोंडी/अंर्तगत मुल्यमापण/प्रात्यक्षिक परिक्षेस प्रविष्ठ होत असतील तर अशा विद्यार्थ्याना संगणीकृत प्रवेशपत्र दिलेले आहेत. मात्र त्यांचे बैठक क्रमांक OMR गुणतक्त्यात असणार नाहीत.त्यांची परीक्षा घेवून गुणतक्त्याच्या शेवटी बैठक क्रमांक नोंद घेवून गुण भरावेत. जर गैरहजर असतील तर बैठक क्रमांक नोंदवून त्या पुढे AA अशी नोंद करावी व तसे अतिरिक्त नोंद केल्याची गुणाच्या नोंदीचे स्वतंत्र पत्र मंडळाकडे देण्यात यावे.

७. सर्व विषयाचे गूण तक्ते काळजीपूर्वक भरुन ते अनुक्रमांकानुसार मंडळाने पुरविलेल्या पाकीटात सादर करावे.

भाषा विषयांची तोंडी परीक्षा तसेच गणित, तंत्र व पुर्व व्यावसायिक ,शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य परीक्षा झाल्यानंतर शाळांनी वितरण केंद्रावर दिनांक ०६/१०/२०२१ रोजी न चुकता जमा करावयाचे आहे.

केंद्र शाळांनी त्यांच्या विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे गुणतक्ते पाकीट व त्यांच्या शाळेचे तोंडी/अंतर्गत मुल्यामापण गुणतक्ते पाकीट व केंद्राचे पाकीट व इतर साहित्य दिनांक ०६/१०/२०२१ रोजी न चुकता वितरण केंद्रावर जमा करावयाचे आहे.

**सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हातील सर्व वितरण केंद्रानी त्यांच्या कडे जमा झालेले साहित्य त्यांच्या प्रतिनिधीमार्फत तालुकानिहाय, शाळानिहाय व्यवस्थित लावून दिनांक ०७.१०.२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत मंडळ कार्यालयात न चुकता जमा करावयाचे आहे याची वितरण केंद्रप्रमुखानी नोंद घ्यावी**.

कोल्हापूर शहर, कागल, करवीर, पन्हाळा, गगनबावडा व शाहूवाडी या तालुक्यातील माध्यमिक शाळांनी श्रेणी, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य दि. ०६.१०.२०२१ रोजी मंडळ कार्यालयात न चुकता जमा करावयाचे आहे.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीसाठी,**

१. केंद्रसंचालक - केंद्रप्रमुखांनी प्रात्यक्षिक साहित्य वितरण केंद्रावर दि. ०६.१०.२०२१ रोजी जमा करावे.

२. जिल्हा वितरण केंद्र - कळविण्यात येते की मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या साहित्याचे नियोजित दिवशी वितरीत करावे आणि शाळेकडून आपणाकडे जमा झालेले साहित्या आपल्या प्रतिनीधीमार्फत तालुकानिहाय, शाळानिहाय व्यवस्थित लावून दिनांक ०७.१०.२०२१ रोजी मंडळ कार्यालयात न चुकता जमा करावयाचे आहे